परिपत्रक क्र. ७४

इ.५ वी ते ९ वी द्वितीय सत्र परीक्षा सन २०१७-२०१८ परीक्षा संचालनाबाबत मार्गदर्शक सूचना :

# रयत शिक्षण संस्था,सातारा.

## कर्मवीर समाधी परिसर, सातारा.

माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग

परिपत्रक क्र. ७४ दिनांक १७/३/२०१८

**योग्य त्या कार्यवाहीसाठी**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये,माध्यमिक विद्यालयांशी संलग्नित सर्व उच्च माध्यमिक विद्यालये,
प्राथमिक शाळा,रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ----------

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: पीआरई/२०१०/(१३६/१०)/प्राशी-५, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई – २० ऑगष्ट, २०१० चा जी.आर.

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांची इ.५ वी ते ९ वी द्वितीय सत्र परीक्षा (सेमी.इंग्रजी माध्यमासह) दिनांक ०५/४/२०१८ ते १७/४/२०१८ या कालावधीत घेतली जाणार आहे. त्या संबंधीचे वेळापत्रक यासोबत जोडून पाठविले आहे. या वेळापत्रकानुसार या परीक्षा घ्याव्यात. कोणत्याही परिस्थितीत वेळापत्रकानुसार ज्या दिवशीचा पेपर त्या दिवशीच होईल हे कटाक्षाने पहावे. सदर परीक्षा संचालनाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

### १) बैठक व्यवस्था :-

विद्यालयात उपलब्ध असलेल्या वर्गखोल्यांचा वापर सकाळ व दुपारच्या पेपरसाठी करावा. सकाळच्या पेपरसाठी इ.५ वी ते ७ वीच्या विद्यार्थांची सरमिसळ करून बैठक व्यवस्था करावी व दुपारच्या पेपरसाठी इ.८ वी व ९ वीच्या विद्यार्थांची सरमिसळ करून बैठक व्यवस्था करावी. एकदा केलेली बैठक व्यवस्था सर्व विषयांसाठी समान ठेवावी. भूमितीच्या पेपरसाठी बैठकव्यवस्था बदलू नये. या पेपरच्या वेळी इ.९ वी चे विद्यार्थी आपापल्या बैठक क्रमांकावर बसतील. मात्र इ.८ वीच्या विद्यार्थांना हा विषय नसल्याने त्या बैठक क्रमांकाच्या जागा रिकाम्या राहतील.

### २) परीक्षा ब्लॉकमधील बैठकव्यवस्था :-

विद्यार्थी एकमेकांचे पाहून लिहिणार नाहीत हा दृष्टीकोन लक्षात घेऊन बैठकव्यवस्था करावी. एका ब्लॉकमध्ये सुपरव्हिजन करणे सोयीचे होईल एवढीच विद्यार्थी संख्या असावी.

### ३) कॉपीस प्रतिबंध :-

विद्यार्थांना कॉपीपासून दूर राहण्याचे संस्कार शाळांनी करावेत. एकमेकांची उत्तरे पाहून लिहिणे, अगर कॉपी (कागद) आणून त्यातून पाहून लिहिणे, पर्यवेक्षकाने विद्यार्थांना उत्तरे सांगणे असे गैरप्रकार परीक्षेच्या कालावधीत होणार नाहीत याची खबरदारी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी घ्यावी.

## ४) उत्तरपत्रिका तपासणी व निकाल पत्रक तयार करणे :-

विद्यालयातील संबंधित शिक्षकांनी विद्यार्थांच्या उत्तरपत्रिका शाळेच्या वेळेत व शाळेतच तपासाव्यात. शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासावयास दिल्याची पोहोच घेऊन ती मुख्याध्यापकांनी स्वत:कडे ठेवावी. पेपर्स जसजसे होत जातील तसतसे त्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी संबंधित विषय शिक्षकांकडे सुपूर्द कराव्यात. विषय शिक्षकांनी त्या दिलेल्या मुदतीत तपासून गुणपत्रिका वर्गशिक्षकांना द्याव्यात. वर्ग शिक्षकांनी वेळेत निकालाचे काम पूर्ण करावे. नमुना उत्तरपत्रिका शिक्षकांचेकडून तयार करून घ्यावी.

उत्तरपत्रिका तपासणी काम काळजीपूर्वक करावे व शाखाप्रमुखांनी सदर तपासणीचे काम अचूक झाले असल्याची खात्री करावी. उत्तरपत्रिकांची नियमानुसार फेरतपासणी (मॉडरेशन) करावे. सर्व उत्तरपत्रीकांमधील गुणांची पडताळणी करावी.

## ५) प्रश्नपत्रिका ताब्यात घेणे :-

इयत्तानिहाय पुरेशा प्रश्नपत्रिका मिळाल्याची खात्री दिनांक ३/४/२०१८ रोजीच करावी. (गठ्यावर प्रश्नपत्रिका संख्या लिहिली आहे.) मागणीपेक्षा प्रश्नपत्रिका कमी असल्याचे आढळल्यास विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक तेवढ्या प्रश्नपत्रिका मिळवाव्यात.

## ६) वेळापत्रकातील विषयांखेरीज अन्य विषयांची परीक्षा :-

जर काही विद्यालयांमध्ये वेळापत्रकात दर्शविलेल्या विषयांशिवाय अन्य विषय शिकविले जात असतील तर संबंधित शाखांनी त्या विषयांच्या परीक्षा आपल्या स्तरावर वेळापत्रकातील दिवस सोडून अन्य दिवशी आपापल्या सोयीनुसार घ्याव्यात.

**महत्वाचे :-**

## ७) इ.५ वी ते ९ वीच्या परीक्षेमध्ये झालेल्या बदलाबाबतच्या सूचना :-

(१) इ.५ वी ते ९ वीच्या परीक्षेमध्ये झालेल्या बदलाबाबत संस्थेकडील वरील संदर्भ परिपत्रक क्र.१९ आणि संदर्भ परिपत्रक क्र.१६ मध्ये दिलेल्या सूचनांचे तसेंच गतवर्षी इ.९ वी नवीन बदललेल्या अभ्यासक्रमाच्या नवीन पुस्तिका छापून त्या विभागीय कार्यालयामार्फत आपणाकडे पोहोच झालेल्या आहेतच. या सर्वांचे बारकाईने अवलोकन करावे. त्याप्रमाणे सोबतच्या परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषयांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत याची नोंद घ्यावी.

(२) संस्थेने बदललेल्या अभ्यासक्रमाचा विचार करून इ.५ वी ते इ.१० वीच्या संपूर्ण विषयांच्या वार्षिक अभ्यासक्रम पुस्तिका (वेळोवेळी झालेल्या बदलाचा विचार करून) छापून यापूर्वीच त्या त्या वर्षी आपल्या विभागीय कार्यालयामार्फत आपणास पोहोच झालेल्या आहेतच. तसेंच त्यानंतर अनेक विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये जे थोडक्यात बदल झालेले होते त्याचा विचार करून इ.५ वी ते इ.१० वीच्या संपूर्ण विषयांच्या वार्षिक अभ्यासक्रम पुस्तिका पुन्हा छापून घेऊन त्या विभागीय कार्यालयामार्फत आपणास मिळालेल्या आहेतच. त्यानुसार प्रश्नपत्रिका काढलेल्या असून, त्यानुसार आपण आपल्या शाखेत सत्र दुसरीचा अभ्यासक्रम सत्र परीक्षा दुसरी सुरु होण्यापूर्वी विध्यार्थांना शिकवून पूर्ण केला असल्याची खात्री करावी.

(३) वरीलप्रमाणे घेतलेल्या चाचण्या, वार्षिक परीक्षा व विध्यार्थांच्या कामाचे वर्षभर केलेले मूल्यमापन यानुसार वार्षिक निकालपत्रक तयार करण्यात यावे. निकालपत्रक तयार करण्यासंबंधीच्या सूचना आपल्या विभागीय कार्यालयाने आपणास दिल्या असतीलच. त्याबाबत काही अडचणी अगर शंका असल्यास आपल्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

**अत्यंत महत्वाचे :-**

महाराष्ट्र शासनाने सर्व शाखांना पाठविलेल्या वरील संदर्भीय क्रमांक ३) महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २० ऑगष्ट, २०१० च्या जी.आर.कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने इ.१ ली ते ८ वी साठी (प्राथमिक स्तर) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार –

१) इ.१ ली ते ८ वीच्या सर्व विषयांच्या (इ.५ व इ.६ वी- ४० गुण आणि इ.७ वी व इ.८ वी- ५० गुण) याप्रमाणे संकलित मूल्यमापन सोबतच्या वेळापत्रकाप्रमाणे घेतले जाणार आहे. त्या अगोदर सर्व शाखांतील इ.५ ते इ.८ वीच्या सर्व विषयांच्या संबंधित विषय शिक्षकांनी आकारिक मूल्यमापन पूर्ण करावे. सदरचे काम संबंधित विषय शिक्षकांनी पूर्ण केल्याची आपण खात्री करावी.

२) कला,कार्यशिक्षण,शारीरिक शिक्षण या विषयांच्या आकारिक मूल्यमापनाचे कामासंदर्भात सर्व शाखेतील संबंधित विषय शिक्षकांनी प्रत्येक सत्रात प्रत्येकी १०० गुण याप्रमाणे प्रत्येक सत्रांन्त पूर्ण करण्याबाबत संस्थेने इ.५ ते इ.१० वीच्या पहिल्या सत्र परीक्षेच्या वेळी (वेळापत्रकाच्या दुस-या पानावरील संस्थेने बदलून पाठविलेला तक्ता पाहावा.) कळविलेले होते. तोच तक्ता सोबतच्या परीपत्रकाबरोबर जोडलेल्या दुस-या पानावार नमुन्यादाखल पुन्हा दिलेला आहे. त्याचा योग्य तो वापर करून, संबंधित विषयाच्या आकारिक मूल्यमापनाचे काम सर्व शाखांमध्ये वेळेत पूर्ण करण्यात यावे. तसेंच पहिली सत्र परीक्षा/दुसरी सत्र परीक्षा/ बाबत निकालपत्रके व गुणदान योजनेचा योग्य वापर करावयाचा आहे याची नोंद घ्यावी.

३) शाळेची वर्षभराची नेहमीची वेळ यामध्ये (संस्था परीक्षा कालावधी सोडून) आता कोणताही बदल करू नये. तसेंच शाखेतील सर्व सेवकांनी शाखेच्या नेहमीच्या वेळेत पूर्णवेळ शाखेत उपस्थित राहावे.

वरील सर्व बाबींची नोंद घेवून इ.५ ते इ.९ वी दुस-या सत्र परीक्षेच्या प्रश्नपत्रिका (सेमी.इंग्रजी माध्यमासह) दिनांक ३/४/२०१८ पर्यंत आपल्या गटपातळीवर पोहोच केल्या जाणार आहेत याची नोंद घेवून, आपण आपल्या गटप्रमुखाच्या संपर्कात राहून आपल्या प्रश्नपत्रिका दि.०४/०४/२०१८ रोजी ताब्यात घेण्याची व्यवस्था करावी. यानुसार इ.५ ते इ.९ वी दुसरी सत्र परीक्षा योग्य प्रकारे घ्याव्यात. त्यात कांही अडचणी आल्यास आपल्या विभागीय कार्यालयामार्फत पूर्तता करून घ्यावी.

सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

कळावे.

(श्री.विलास महाडीक)
**सहसचिव(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था,सातारा.**

सोबत- १) इ.५ वी ते ९ वी दुसरी सत्र परीक्षा- परीक्षा वेळापत्रक

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

(१) विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग,सातारा, दक्षिण विभाग,सांगली, उत्तर विभाग, अहमदनगर, पश्चीम विभाग,पुणे आणि रायगड विभाग,पनवेल.

(२) व्यवस्थापक, रयत प्रिंटींग प्रेस, सातारा.

(३) व्यवस्थापक, रयत प्रिंटींग प्रेस, अहमदनगर.

(४) मुख्याध्यापक (गटप्रमुख शाखा) यांना- आपण वरील सूचनेप्रमाणे सर्व प्रश्नपत्रिका संबंधित शाखांना वेळेत त्यांच्या ताब्यात देण्याची व्यवस्था करावी.

# रयत शिक्षण संस्था,सातारा.

## सत्र परीक्षा दुसरी (२०१७-२०१८)

### वेळापत्रक

### इ.५ वी ते ९ वी अखेर

| अ.न. | वार | दिनांक | विषय | इयत्ता | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गुरुवार | ५/४/२०१८ | हिंदी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | हिंदी | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | हिंदी / संस्कृत | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | हिंदी / संस्कृत | ९ वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| | | | हिंदी (संयुक्त) | ८ वी | दुपारी २-३० ते ३-३० | २५ |
| | | | हिंदी (संयुक्त) | ९ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| २. | शुक्रवार | ६/४/२०१८ | इतिहास+ना.शास्त्र | ६ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २० |
| | | | इतिहास+ना.शास्त्र | ७ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | इतिहास+ना.शास्त्र | ८ वी | दुपारी २-३० ते ३-३० | २५ |
| | | | इतिहास+ना.शास्त्र | ९ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ६० |
| ३. | शनिवार | ७/४/२०१८ | परिसर अभ्यास १ व २ | ५ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | भूगोल | ६ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २० |
| | | | भूगोल | ७ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | भूगोल | ८ वी | दुपारी २-३० ते ३-३० | २५ |
| | | | भूगोल | ९ वी | दुपारी २-३० ते ४-३० | ४० |
| ४. | सोमवार | ९/४/२०१८ | (भूमिती) गणित – II | ९ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| ५. | मंगळवार | १०/४/२०१८ | विज्ञान व तंत्रज्ञान भाग- I | ९ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| ६. | बुधवार | ११/४/२०१८ | संस्कृत (संयुक्त) | ८ वी | सकाळी ११-०० ते १२-०० | २५ |
| | | | संस्कृत (संयुक्त) | ९ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| ७. | गुरुवार | १२/४/२०१८ | मराठी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | | ९ वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| ८. | शुक्रवार | १३/४/२०१८ | इंग्रजी | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | | ९ वी | दुपारी २-३० ते ५-३० | १०० |
| ९. | सोमवार | १६/४/२०१८ | गणित | ५ वी व ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | (बीजगणित) गणित – I | ९ वी | दुपारी २-३० ते ४-३० | ४० |
| १०. | मंगळवार | १७/४/२०१८ | सामान्यविज्ञान | ६ वी | सकाळी ११-०० ते १-०० | ४० |
| | | | | ७ वी | सकाळी ११-०० ते १-३० | ५० |
| | | | | ८ वी | दुपारी २-३० ते ५-०० | ५० |
| | | | विज्ञान व तंत्रज्ञान भाग- II | ९ वी | दुपारी २-३० ते ४-३० | ४० |

सहसचिव (माध्य.)
रयत शिक्षण संस्था, सातारा

टीप :- १) वरील वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेण्यात याव्यात.

२) तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा नवीन बदलाप्रमाणे शासकीय नियमानुसार विहित नमुन्यात परीक्षेपूर्वी घ्याव्यात.

३) शासनाच्या निर्णयानुसार इ. ५ वी ते ९ वीच्या विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा व भाषा व एच्छिक विषयांच्या तोंडी परीक्षा या विषयांचे आकारिक मूल्यमापन दिनांक ०५/४/२०१८ पूर्वी पूर्ण करण्यात यावे.

**४) इ., ५ वी ते ८ वीच्या मराठी, इंग्रजी, गणित व सामान्यविज्ञान या विषयाच्या प्रश्नपत्रिकां शासन स्तरावरून पुरविल्या जाणार नसल्यामुळे त्या संस्था पातळीवर तयार करण्यात आल्या आहेत. या प्रश्नपत्रिकां शासन संकलित प्रमाणे नाहीत याची नोंद घावी.**

५) सदरचे पत्रक **http://www.rayatshikshan.edu** संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

(श्री.विलास महाडीक)
सहसचिव(माध्य.)
रयत शिक्षण संस्था,सातारा.

सातारा : १७/३/२०१८